# १. समाजशास्त्राचा परिचय

१.१ समाजशास्त्र – व्याख्या आणि स्वरूप
१.२ समाजशास्त्र – उगम आणि व्याप्ती
१.३ समाजशास्त्राचे महत्त्व

## प्रस्तावना

पहिल्या प्रकरणामध्ये आपण समाजशास्त्र ही एक स्वतंत्र विद्याशाखा कशी आहे हे शिकणार आहोत. समाजशास्त्राचे स्वरूप आणि व्याप्ती याचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा हा या प्रकरणाचा उद्देश आहे.

युरोपमधील १८ व्या व १९ व्या शतकांतील सामाजिक, बौद्धिक परिस्थिती आणि समाजशास्त्राचा उगम यांच्यातील परस्परसंबंधांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला गेला आहे. एक विद्याशाखा म्हणून समाजशास्त्राचा उगम युरोपमध्ये झाला.

समाजशास्त्र ही एक स्वतंत्र विद्याशाखा म्हणून १९ व्या शतकाच्या मध्यात उदयास आली. समाजशास्त्राच्या उदयानंतर मानवी समाजाचा अभ्यास करण्याचा दृष्टिकोन बदलला. समाजशास्त्र हे एक स्वतंत्र ओळख असलेले नवीन सामाजिक शास्त्र म्हणून उदयाला आले.

समाजशास्त्र हे प्रामुख्याने मानवी समाजाचा अभ्यास करते. म्हणून 'समाजाचे शास्त्र' अशी त्याची ओळख निर्माण झाली. समाजशास्त्र हे एक सामाजिकशास्त्र आहे. त्याची स्वतंत्र ओळख आहे म्हणूनच आज जगात सर्वत्र समाजशास्त्राचे महत्त्व आणि व्यावहारिक उपयुक्तता निर्विवादपणे मान्य होत आहे.

समाजशास्त्रात मुख्यत्वेकरून मानवी जीवन, मानवी क्रिया यांचा अभ्यास केला जातो. मानवी समाजाचा उदय, विकास आणि मानवी समाजाची संरचना आणि कार्य यांच्या अभ्यासाला महत्त्व दिले जाते. सामाजिक जीवनातील विविध घटकांमधील परस्परसंबंध आणि परस्परावलंबनाचा विचार समाजशास्त्र करते. हे शास्त्र समाजातील स्थिरता आणि परिवर्तन, उत्क्रांती आणि क्रांती या घटकांवरही प्रकाश टाकते.

समाजशास्त्र हे स्वतंत्र सामाजिकशास्त्र असून सामाजिक घटनांचा शास्त्रीय अभ्यास करते. थोडक्यात हे एक सामाजिक संबंध आणि सामाजिक वर्तनाचे अध्ययन करणारे शास्त्र आहे.

## १.१ समाजशास्त्राची व्याख्या आणि स्वरूप

समाजशास्त्र हे समाजाचे शास्त्र असून यात सामाजिक संबंध आणि मानवी समाजाचा अभ्यास केला जातो. तसेच सामाजिक संबंध, त्याचे प्रकार, विविधता, सामाजिक समूह, सामाजिक संरचना, सामाजिक दर्जा, सामाजिक नियमने, सामाजिक समस्या, समाजाचे बदलते स्वरूप इत्यादी अनेक गोष्टींचा अभ्यास यात केला जातो.

समाजशास्त्र म्हणजे काय? या प्रश्नाचे अत्यंत साधे व सोपे उत्तर असे की, समाजशास्त्र म्हणजे 'समाजात राहणाऱ्या माणसांचा अभ्यास' किंवा समाजशास्त्र म्हणजे 'सामाजिक घटनांचा शास्त्रीय अभ्यास'. समाजशास्त्राची अचूक व्याख्या समजावून घेण्यासाठी आपल्याला समाजशास्त्र या शब्दाची व्युत्पत्ती कशी झाली हे समजावून घ्यावे लागेल.

फ्रेंच तत्त्ववेत्ता 'ऑगस्ट कॉम्त' यांना समाजशास्त्राचा जनक म्हणून संबोधले जाते. Sociology हा इंग्रजी शब्द १८३९ मध्ये प्रथम

वापरल्याचे श्रेय ऑगस्ट कॉम्त यांना दिले जाते. त्यांनी 'Positive Philosophy' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाच्या चौथ्या आवृत्तीत त्यांनी प्रथम 'समाजशास्त्र' ही संज्ञा वापरली.

लॅटीन भाषेतील 'Socius' व ग्रीक भाषेतील 'Logos' या शब्दांपासून 'Sociology' ही संज्ञा तयार झाली. Socius म्हणजे सहकारी किंवा सहयोगी होय. कालांतराने Socius हा शब्द समाज या अर्थाने वापरला जाऊ लागला. Logos म्हणजे शास्त्र किंवा अभ्यास. म्हणजेच समाजशास्त्राचा शब्दशः अर्थ 'समाजाचे शास्त्र' असा होतो. सुरुवातीला कॉम्त यांनी या शास्त्रास 'सामाजिक पदार्थविज्ञान' ही संज्ञा वापरली. नंतर त्याला समाजशास्त्र हे नाव दिले गेले. त्यांनी सामाजिक घटनांचा शास्त्रीय पद्‌धतीने अभ्यास करणारे समाजशास्त्र हे नवीन शास्त्र शोधले.

### १.१.१ व्याख्या

१. ***ऑगस्ट कॉम्त :*** "सामाजिक व्यवस्था आणि प्रगतीचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र."

२. ***जॉर्ज सिमेल :*** "समाजशास्त्र हे मानवी आंतरसंबंधांच्या स्वरूपाचे अध्ययन करणारे शास्त्र आहे."

३. ***ऑक्सफर्ड डिक्शनरी :*** "समाजशास्त्र म्हणजे मानवी समाजाचा विकास, संरचना आणि कार्य यांचा अभ्यास होय."

या व्याख्यांचे विश्लेषण करताना असे लक्षात येते की, बहुतेक समाजशास्त्रज्ञांच्या मते, सामाजिक संबंध आणि सामाजिक घटना हा समाजशास्त्राचा अभ्यासविषय आहे. समाजशास्त्र आणि त्याचा अभ्यासविषय यांचे स्वरूप अत्यंत व्यापक व गुंतागुंतीचे आहे. त्यामुळे समाजशास्त्राची एक सर्वमान्य अशी व्याख्या करता येत नाही. तरीदेखील, वरील व्याख्यांवरून सामान्यपणे पुढील तीन मुद्दे दिसून येतात.

१. वरील सर्व व्याख्यांमध्ये समाजशास्त्राच्या शास्त्रीय स्वरूपावर भर दिला आहे.

२. या व्याख्यांमध्ये मानव आणि समाज यांच्यातील संबंधांवर भर दिला आहे.

३. या व्याख्यांवरून असे स्पष्ट होते की, समाजशास्त्र हे एक गुंतागुंतीचे शास्त्र असून इतर सामाजिक शास्त्रांपेक्षा वेगळे आहे.

**समाजशास्त्रीय कल्पनाविस्तार म्हणजे काय?**

समुद्रातील माशांना सागरी जीवशास्त्र किंवा समुद्री लहरींबाबत काही समज असते का?- बहुधा नाही. आपल्या बऱ्याच जणांचं या माशांसारखच असतं. ज्या समाजात आपण राहतो व ज्या संस्कृतीचे पाईक असतो तिची नीट समज आपल्याकडे नसते. आपल्या भोवतालच्या परिस्थितीचे आकलन होण्यासाठी सामान्यज्ञानाच्या पलीकडे जाऊन सखोल विचार करणे आवश्यक असते. आपल्या दैनंदिन जीवनाचा अर्थ चांगल्या प्रकारे समजण्यासाठी समाजशास्त्रीय कल्पनाविस्तार हे उपयुक्त साधन आहे.

१९५९ मध्ये सी.राईट मिल्स् यांनी 'The Sociological Imagination' हे पुस्तक लिहिले. मिल्स् यांच्या मते, ज्यांच्याकडे उत्तम प्रकारचे समाजशास्त्रीय ज्ञान असते, त्यांच्याकडे एक खास वैचारिक दृष्टीही असते. या समाजशास्त्रीय कल्पनाविस्ताराच्या दृष्टीमुळे व्यक्तिगत जीवन आणि सामाजिक जीवनातील परस्परसंबंध चांगल्या प्रकारे समजतो. मिल्स् यांच्या मते आपल्या व्यक्तिगत समस्यांचे आकलन होण्याबरोबरच त्यांना सामाजिक संदर्भ लावून त्या सोडवण्यासाठी लागणारा कृतिशील दृष्टिकोन समाजशास्त्रीय कल्पनाविस्तारामुळे आपल्याला मिळतो.

### १.१.२ समाजशास्त्राचे स्वरूप

समाजशास्त्र ही एक ज्ञानशाखा असून ती मानवाचे सामाजिक जीवन आणि समाजाचे विस्तृत ज्ञान देते. समाजशास्त्र हे इतर सामाजिक शास्त्रांपेक्षा अनेक बाबतींत वेगळे आहे. समाजशास्त्राचे स्वरूप समजून घेण्यासाठी खालील मुद्‌दे पाहणे आवश्यक आहे.

१. **समाजशास्त्र एक अनुभवाधिष्ठित विज्ञान आहे:** समाजशास्त्रामध्ये सामाजिक तथ्यांचा अभ्यास आणि विश्लेषण हे वैज्ञानिक पद्‌धतीच्या साहाय्याने केले जाते. हे शास्त्र केवळ आरामखुर्चीत बसून केलेल्या तात्त्विक चिंतन किंवा विचारांवर आधारित नाही. तर निरीक्षण, प्रयोग, परीक्षण अशा वैज्ञानिक प्रक्रियांच्या माध्यमातून समाजशास्त्रात नियम मांडले जातात. अनुभवाधिष्ठितता हे समाजशास्त्राचे प्रमुख वैशिष्ट्य मानले जाते.

> **अनुभवाधिष्ठिततावाद**
>
> या वैचारिक दृष्टिकोनानुसार मानवी ज्ञान हे अनुभवाच्या आधारेच साध्य करता येते. अनुभवाधिष्ठिततावादानुसार ज्ञान हे संशोधकांच्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारित असते.

२. **समाजशास्त्र हे एक सैद्‌धांतिक आणि उपयोजित विज्ञान आहे :** समाजशास्त्रीय सिद्‌धान्ताची निर्मिती आणि विकास अत्यंत पद्‌धतशीरपणे झालेला आहे. जुन्या सिद्‌धान्ताचे परीक्षण करणे आणि नवीन सिद्‌धान्ताची निर्मिती करणे ही प्रक्रिया सातत्याने सुरू आहे. समाजशास्त्र हे एक शुद्‌ध सैद्‌धांतिक शास्त्र म्हणून ओळखले जात होते, परंतु आता मात्र समाजशास्त्र हे केवळ एक सैद्‌धांतिक शास्त्र राहिलेले नाही तर समाजशास्त्राच्या विविध शाखा या सामाजिक ज्ञानाच्या उपयोजनावर आधारलेल्या असून त्यांचा समाजात मोठा उपयोग होत आहे. म्हणजेच समाजशास्त्र हे शुद्‌ध विज्ञान आहे. तसेच ते एक उपयोजित विज्ञानही आहे.

३. **समाजशास्त्र हे तथ्यांवर आधारित विज्ञान आहे :** समाजशास्त्राचा उद्‌देश हा समाजातील सत्य घटनांचा शोध घेणे हा आहे. समाजात जे जसे घडते तसा त्याचा अभ्यास केला जातो. समाजात ‘काय असले पाहिजे’ यापेक्षा ‘काय आहे’ याचा विचार समाजशास्त्रात केला जातो. उदा., समाजशास्त्रात समाजातील संघटनात्मक आणि विघटनात्मक घटकांचा अभ्यास केला जातो. तसेच नैतिक-अनैतिक घटकांचाही अभ्यास केला जातो.

४. **समाजशास्त्र हे समग्र विज्ञान आहे :** समाजशास्त्र संपूर्ण समाजाचा अभ्यास करते. यात समाजातील फक्त एखाद्या विशिष्ट भागाचाच अभ्यास केला जात नाही तर सामाजिक जीवनाच्या सर्व पैलूंचा अभ्यास केला जातो.

## १.२ समाजशास्त्र - उदय आणि व्याप्ती

### १.२.१ समाजशास्त्राचा उदय

समाजशास्त्राच्या उदयाची प्रक्रिया समजावून घेण्यासाठी आपल्याला समाज आणि त्या त्या काळातील विचार यांतील संबंध जाणून घेणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक कालखंडातील सामाजिक परिस्थिती आणि त्यात निर्माण होणारे विचार यांच्यामध्ये संबंध असतो आणि त्या काळावर त्याचा प्रभाव असतो. तसेच त्यांच्यात सुसूत्रता असते.

सुरुवातीच्या काळातील समाजशास्त्रज्ञांनी ज्या कल्पना किंवा विचार केला त्यांचे मूळ हे युरोपातील सामाजिक परिस्थितीमध्ये दिसून येते. युरोपमधील फ्रेंच राज्यक्रांती आणि औद्योगिक क्रांतीमुळे जे

प्रचंड आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिवर्तन झाले त्यातून समाजशास्त्राचा एक शास्त्रीय विद्याशाखा म्हणून उदय झालेला आपल्याला दिसून येतो. या बदलांच्या कालखंडाला युरोपमधील 'प्रबोधनाचा कालखंड' असे म्हटले जाते. कारण याच काळात १८ व्या शतकातील फ्रेंच तत्त्ववेत्यांच्या विचारांना मूर्त, प्रकट रूप प्राप्त झाले.

प्रबोधनकाळात पारंपरिक विचार प्रक्रियेत टोकाचे बदल झाले व विचार करण्याच्या आणि वास्तवाकडे बघण्याच्या नवीन पद्धती पुढे आल्या. जीवनातील प्रत्येक गोष्टीकडे व्यक्ती नवीन दृष्टिकोनातून बघू लागल्या. वैज्ञानिक आणि विवेकवादी विचारांना महत्त्व प्राप्त झाले. फ्रेंच राज्यक्रांती आणि औद्योगिक क्रांतीच्या काळात जी वैज्ञानिक आणि व्यावसायिक क्रांती झाली त्यातून एक नवीन दृष्टिकोन निर्माण झाला. त्यातूनच समाजशास्त्राचा उदय झाला.

**प्रबोधन काळ**

प्रबोधन काळ म्हणजे युरोपीय विचारांचा असा कालखंड की ज्यात कारणमीमांसा, अनुभव, धार्मिक आणि पारंपरिक अधिकारांना आव्हान दिले गेले आणि त्यातून धर्मनिरपेक्ष, उदारमतवादी आणि लोकशाही मूल्ये असणारा समाज निर्माण झाला. या काळामध्ये बौद्धिक घटकांमुळे प्रत्यक्षवादी/विज्ञानवादी, तर्कशुद्ध, विवेकवादी व शास्त्रीय विचारांना महत्त्व प्राप्त झाले. त्यांनीही कार्यकारण संबंधांवर भर दिला. या बुद्धीप्रामाण्यवादी विचारवंतांमध्ये प्रामुख्याने थॉमस हॉब्ज, जॉन लॉक, रूसो, माँटेस्क्यु, फ्रान्सिस बेकन, सिसेरो, मॅकिअ‍ॅव्हली इत्यादी विचारवंतांचा समावेश करता येतो.

औद्योगिक क्रांती आणि फ्रेंच राज्यक्रांतीने जुन्या युरोपातील प्रत्येक गोष्टीला आव्हान उभे केले. वर्गांची पुनर्रचना झाली, जुनी वर्ग व्यवस्था मागे टाकून नवीन वर्ग निर्माण झाले. धर्माला आव्हान निर्माण झाले. धर्माचे महत्त्व कमी होऊ लागले. कौटुंबिक संरचना, मूल्ये बदलली. महिलांच्या स्थानात बदल होऊ लागला. राजेशाही नष्ट होऊन लोकशाहीचा उदय झाला. धर्म, समुदाय, सत्ता, संपत्ती आणि समाजाची संकल्पना देखील बदलली.

या सर्वांतून निर्माण झालेल्या सामाजिक परिस्थितीतून समाजशास्त्राचा उदय कसा झाला हे आपण पाहू. सामाजिक परिस्थिती, व्यावसायिक आणि वैज्ञानिक क्रांती, बौद्धिक शक्तींचा प्रभाव, औद्योगिक आणि फ्रेंच राज्यक्रांती या सर्व घटनांच्या परिणामांमुळे युरोपमध्ये मोठ्या प्रमाणावर परिवर्तन झाले व त्यातूनच समाजशास्त्राचा उदय झाला.

## समाजशास्त्राच्या निर्मितीवर प्रभाव टाकणारे घटक

**१. व्यापारी क्रांती :** सन १४५० ते १८०० या काळात घडलेल्या अनेक घटनांची मालिका म्हणजे ही क्रांती होय. या सर्व घटनांमुळे युरोपमधील मध्य युगातील कुंठित आणि उपजीविकेपुरती असणारी अर्थव्यवस्था बदलू लागली. व्यावसायिक क्रांती म्हणजे उद्योग आणि आर्थिक व्यवहारांत वाढ होऊन मोठ्या प्रमाणात उत्पादनात वाढ झाली. त्यामुळे युरोपीय देशांची आर्थिक व राजकीय सत्ता निर्माण झाली. उद्योगासाठी भूमार्गापेक्षा सागरी मार्गांना अधिक पसंतिक्रम मिळू लागला. युरोपमधील बाजारात पूर्वेकडून आलेल्या उत्पादित माल, मसाले आणि कापडाची रेलचेल दिसू लागली.

बँक सेवा अधिकाधिक विस्तारित होऊ लागली. आर्थिक क्रांतीचे हे द्योतक होते. कागदी चलन अस्तित्वात आले. या सर्व क्रांतीकारी बदलांमुळे मध्यम वर्गाची निर्मिती होऊन त्यांनाही आर्थिक सत्तेत सहभागी होता येऊ लागले हा अत्यंत महत्वाचा बदल होता.

या सर्व बदलांचा परिणाम म्हणून समाजातील सामाजिक संबंधांमध्ये बदल होऊ लागले. या सर्व बदलांचे स्वरूप आणि प्रकार हा समाजशास्त्राचा अभ्यासविषय बनला.

२. **औद्योगिक क्रांती :** इंग्लंडमध्ये १८ व्या शतकामध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात आमूलाग्र बदल घडून आले. प्रथम इंग्लंडमध्ये, नंतर इतर युरोपीय देशांमध्ये आणि नंतर इतर खंडांमध्ये हे बदल दिसू लागले. औद्योगिक क्रांती ही एक अशी घटना होती की जिचा युरोपमधील सर्व सामाजिक क्षेत्रांवर प्रभाव पडला.

औद्योगिक क्रांतीमुळे अनेक नवनवीन साधने, यंत्रे व तंत्रज्ञानात सुधारणा होत होत्या. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर वस्तूंचे उत्पादन होत होते. १७६० ते १८३० च्या दरम्यान यंत्रसामग्री, तंत्रज्ञान आणि उत्पादनाच्या व्यवस्थेमध्ये नवीन शोधांची मालिकाच निर्माण झाली होती. ज्याच्या परिणामार्थ कारखाना उत्पादन पद्धती निर्माण झाली.

**सरंजामशाही व्यवस्था** → **भांडवलशाही व्यवस्था**

या आर्थिक बदलांमुळे सरंजामशाही मागे पडून भांडवलशाही पद्धती निर्माण झाली. भांडवलदारांचा नवीन वर्ग निर्माण झाला. त्यांनी औद्योगिक व्यवस्था आपल्या नियंत्रणात ठेवली. औद्योगिक क्रांतीमुळे समाजात मोठा बदल झाला. जुन्या घरगुती उत्पादित वस्तूंकडून नव्या यंत्रोत्पादित वस्तूंकडे वाटचाल सुरू झाली. अशा प्रकारे औद्योगिक क्रांतीचा संपूर्ण समाजावर खूप प्रभाव पडला होता.

> **संघ पद्धती :** संघ पद्धती म्हणजे १३ व्या शतकात युरोपमध्ये प्रचलित असलेली एक वैशिष्ट्यपूर्ण उत्पादन पद्धत होती.

संघ पद्धतीचा अस्त, कारखाना पद्धतीचा उदय, कामगारांची श्रमविभागणी, ग्रामीण-नागरी स्थलांतर, वर्ग व्यवस्था, कामगार संघटना, आर्थिक असमानता आणि लोकशाही पद्धती हे सर्व औद्योगिक क्रांतीचे दृश्य, अदृश्य परिणाम होते.

या सर्व प्रक्रियेत खूप मोठ्या प्रमाणावर ग्रामीण-नागरी स्थलांतर घडून आले. या सर्वांचा हेतू कारखान्यात काम करण्याचा होता. कारखान्यांना आणि नव्याने निर्माण होणाऱ्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेला विविध सेवा पुरवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नोकरशाही निर्माण झाली. या अर्थव्यवस्थेत मुक्त बाजारपेठ ही कल्पना होती ज्यामुळे तिथे कारखान्यातून उत्पादित झालेली अनेक उत्पादने विनिमयासाठी उपलब्ध होती.



औद्योगिक क्रांती

औद्योगिक क्रांती, भांडवलशाही आणि त्यांच्या विरोधात निर्माण होणाऱ्या विविध प्रतिक्रिया या सर्व गोष्टींमुळे पाश्चात्त्य समाजात मोठ्या प्रमाणावर उलथापालथ होत होती, त्याचा समाजशास्त्रज्ञांवर खूप प्रभाव पडला. हे सर्व बदल आणि त्यामुळे निर्माण झालेल्या समस्यांच्या अभ्यासात ऑगस्ट कॉम्त, एमिल डरखाईम, कार्ल मार्क्स, मॅक्स वेबर, जॉर्ज सिमेल हे सर्व समाजशास्त्रज्ञ व्यस्त होते.


या क्रांतीतून निर्माण झालेल्या पुढील महत्त्वपूर्ण मुद्द्यांचा अभ्यास समाजशास्त्रज्ञांच्या दृष्टीने महत्त्वाचा होता.

अ) कामगारांची स्थिती

ब) संपत्तीचे हस्तांतरण

क) नागरीकरण

३. **फ्रेंच राज्यक्रांती :** समाजशास्त्राच्या निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण ठरलेला घटक म्हणजे १७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांतीने सुरू केलेली राजकीय क्रांतीची मालिका होय. प्रामुख्याने फ्रेंच समाजात निर्माण झालेल्या अव्यवस्था व अराजकतेमुळे या काळातले अनेक विचारवंत अस्वस्थ झाले होते.



फ्रेंच राज्यक्रांती

समाजाचे पुनर्संघटन करण्यासाठी काही विचारवंत एकत्र आले होते. १८ व्या व १९ व्या शतकांतील राजकीय क्रांतीमुळे समाजात जे अराजक व असंघटन निर्माण झाले होते ते दूर करून समाजाची नव्याने घडी बसवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. सामाजिक व्यवस्था हा समाजशास्त्रज्ञांच्या जिव्हाळ्याचा विषय बनला होता. यात ऑगस्ट कॉम्त आणि एमिल डरखाईम यांसारखे विचारवंत अग्रगण्य होते.

सन १७८९ मध्ये झालेली फ्रेंच राज्यक्रांती हा स्वातंत्र्य आणि समता यांसाठीच्या मानवी लढ्याच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरला. यामुळे सरंजामशाहीचा अंत होऊन नवीन समाजव्यवस्था अस्तित्वात आली. या क्रांतीमुळे फक्त फ्रान्समध्येच नाही तर संपूर्ण युरोपमध्ये दूरगामी बदल झाले. या क्रांतीतून पुढे आलेल्या संदेशामुळे भारतासारखे देशही प्रभावित झाले. भारताच्या राज्यघटनेच्या प्रास्ताविकातील स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये फ्रेंच राज्यक्रांतीतूनच ज्ञात झालेली आहेत.

४. **वैज्ञानिक क्रांती :** पुनरुज्जीवनाच्या कालखंडात युरोपमध्ये वैज्ञानिक क्रांती घडून आली. सर्वच क्षेत्रांत विज्ञानावर भर देण्यात आला. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत तांत्रिक विकासाचा प्रभाव दिसून येत होता. विज्ञानाला सर्वत्र उच्च प्रतिष्ठा व दर्जा प्राप्त होत होता व विज्ञानाशी संबंधित क्षेत्रांतील व्यक्तींना सर्वांत यशस्वी मानून त्यांना समाजात खूप प्रतिष्ठा मिळत होती.

वैज्ञानिक क्रांतीचा प्रभाव हा फक्त मानवी जीवनातील भौतिक बदलांपुरताच नव्हता तर तो निसर्ग आणि समाजाबद्दलच्या कल्पनांवरही परिणाम करत होता.

युरोपमधील समाजशास्त्राचा उदय हा विज्ञानाच्या शोधांचा आणि कल्पनांचाच एक भाग आहे असे मानले जात होते. सुरुवातीच्या काळातील समाजशास्त्रज्ञांचा असाच आग्रह होता की, समाजशास्त्राची रूपरेषा ही भौतिकशास्त्र किंवा जीवशास्त्रासारख्या नैसर्गिक विज्ञानांप्रमाणे असावी.

प्रबोधनाचा कालखंड हा वैज्ञानिक क्रांतीचा साक्षीदार होता. मानवी जीवनातील सर्व गरजा भागवण्याचे एक साधन म्हणून विज्ञानाकडे बघितले जात होते. नवीन वैज्ञानिक शोधांमुळे अंधश्रद्धांचे उच्चाटन होत होते. समाजशास्त्रामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यामध्ये या कालखंडाचे योगदान महत्त्वाचे आहे.

५. **नागरीकरण :** औद्योगिक क्रांतीचा एक परिणाम म्हणजे लोक मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातून शहरात स्थलांतरित होत होते. यामागचे प्रमुख कारण म्हणजे औद्योगिक क्रांतीमुळे शहरात उपलब्ध होत असलेल्या नोकऱ्या हे होय. या

स्थलांतर व शहरांच्या वाढीचा परिणाम म्हणून शहरांत असंख्य समस्या व प्रश्न निर्माण झाले. उदा., अतिरिक्त गर्दी, प्रदूषण, वाहतूक, आरोग्यविषयक प्रश्न, झोपडपट्ट्यांची वाढ इत्यादी.

शहरी जीवनाचे स्वरूप आणि समस्या यांकडे मॅक्स वेबर आणि जॉर्ज सिमेल यांसारखे इतर अनेक समाजशास्त्रज्ञ आकर्षित झाले. पहिले अमेरिकन समाजशास्त्रीय विचारपीठ शिकागो स्कूल हे नागरीकरणाच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी निर्माण झाले.

**उपक्रम – १**

व्यापारी, वैज्ञानिक, औद्योगिक आणि फ्रेंच राज्यक्रांती हे समाजशास्त्राच्या निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण घटक आहेत याचा अभ्यास आपण केला. भारताच्या संदर्भात औद्योगिक विकासाचा भारतीय समाजावर झालेला परिणाम जाणून घ्या.

## १.२.२ समाजशास्त्राची व्याप्ती

एखाद्या विषयाची व्याप्ती म्हणजे त्याची अध्ययन कक्षा किंवा क्षेत्र होय. तसेच विषयाची व्याप्ती म्हणजे त्याच्या अभ्यासाची सीमारेषा देखील होय. समाजशास्त्राचा अभ्यासविषय खूप व्यापक आहे. कारण सामाजिक आंतरक्रियांमधील सर्व घटक समाजशास्त्राच्या अभ्यासात समाविष्ट होतात. समाजशास्त्राची व्याप्ती पुढील नवीन अभ्यास क्षेत्रांच्या आधारे समजावून घेता येते.

* **जैव समाजशास्त्र :** जैव समाजशास्त्र ही शाखा समाजशास्त्रात नव्याने निर्माण झाली आहे. या शाखेतील संशोधक समाजशास्त्रातील विविध तंत्रे आणि पद्धतींचा वापर करून, तसेच या पद्धतींच्या निष्कर्षांचा उपयोग करून जीवशास्त्राची मानवी सामाजिक जीवनातील भूमिका काय आहे याचा अभ्यास करतात.

* **कलेचे समाजशास्त्र :** कलेच्या समाजशास्त्रात सौंदर्यशास्त्र आणि कला जगताचा अभ्यास केला जातो. यात कलेच्या उत्पादन व ग्रहणाचा सामाजिक संदर्भ समजून घेण्याचा प्रयत्न केला जातो.

* **विपणन बाजार संशोधनाचे समाजशास्त्र :** ही समाजशास्त्राची व्यावहारिक शाखा असून यात समाजशास्त्रीय पद्धती वापरून अर्थपूर्ण पद्धतीने बाजारनीती समजावून घेण्याचा प्रयत्न केला जातो. यात समाजशास्त्रातील व बाजारनीतीतील सैद्धान्तिक ज्ञान, ग्राहकांच्या विविध प्रकारांचे ज्ञान व गरजा यांचे विश्लेषण केले जाते.

* **दृश्य माध्यमांचा अभ्यास करणारे समाजशास्त्र :** सामाजिक जीवनातील सर्व दृश्यांचा/चित्रांचा अभ्यास समाजशास्त्राची ही शाखा करते. समाजशास्त्रीय संशोधनात सर्व दृश्य प्रतिमांचा वापर सामाजिक तथ्य म्हणून करण्याचा प्रयत्न या शाखेद्वारा केला जातो.

* **डायस्पोरा अध्ययन :** डायस्पोरा अध्ययन हा एक नवीन आंतरविद्याशाखीय अभ्यासविषय समाजशास्त्रात नव्याने अभ्यासला जाऊ लागला आहे. यात प्रामुख्याने स्थलांतर व त्याचे मानवी जीवनातील विविध भागांवर होणारे परिणाम अभ्यासले जातात. उदा., सांस्कृतिक, साहित्यिक, सामाजिक, लोकसंख्याविषयक, मानववंशशास्त्रविषयक, राजकीय, आर्थिक आणि आंतरराष्ट्रीय संबंधांविषयी अभ्यास केला जातो.

**डायस्पोरा :** डायस्पोरा म्हणजे अशी विखुरलेली लोकसंख्या जिचे मूळ स्थान म्हणजे एखादा लहान भौगोलिक भाग असतो. डायस्पोरा म्हणजे एखाद्या समूहाचे आपल्या मूळ निवासस्थानापासून झालेले स्थलांतर होय. ग्रीक भाषेत डायस्पोरा म्हणजे 'विखुरणे' पण आता डायस्पोरा ही संज्ञा व्यक्तींच्या अशा गटाला उद्देशून वापरली जाते जे त्यांच्या मूळ स्थानापासून दूर राहूनही तिथली नाळ तुटू देत नाहीत.

## *चित्रपट अध्ययन*

चित्रपट अध्ययन ही २० व्या शतकातील एक नवीन विद्याशाखा आहे. ही एक आंतरविद्याशाखीय शाखा असून विविध सैद्धान्तिक, ऐतिहासिक आणि समीक्षात्मक दृष्टिकोनातून सिनेमा या माध्यमाकडे बघितले जाते. यात प्रामुख्याने चित्रपटांचा कलात्मक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय आणि कथानकीय (narrative) प्रभावाचा विचार केला जातो. वर्ग, वंश, लिंगभाव, वांशिकता यांसारख्या सामाजिक गटांचा अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्रामध्ये चित्रपटांकडे संहिता म्हणून बघितले जाते. समाजशास्त्रात, चित्रपटांतून समाजशास्त्र किंवा चित्रपटांचे समाजशास्त्र असे अभ्यासक्रम अनेक विद्यापीठांनी सुरू केले आहेत.

## *विकास अध्ययन*

विकास अध्ययन हे आंतरविद्याशाखीय क्षेत्र असून जागतिक विकासातील असमानता शोधण्याचा यात प्रयत्न केला जातो. यात ऐतिहासिक संदर्भ तपासून आंतरराष्ट्रीय विकासाचा प्रश्न व प्रक्रियांचा अभ्यास केला जातो. यात प्रामुख्याने ‘विकसित’ आणि ‘विकसनशील’ समाजातील परस्परसंबंध, त्यातील विविध संस्थांची भूमिका आणि त्याचे सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि पर्यावरणीय बदलांच्या प्रक्रियेवर आणि त्याच्या होणाऱ्या परिणामांवर लक्ष केंद्रित केले जाते.

एक व्यावसायिक अभ्यास क्षेत्र म्हणून विकास अध्ययनाला आज खूप महत्त्व आणि वाव आहे. यात सार्वजनिक क्षेत्रातील संशोधन, धोरणांचे विश्लेषण, बिगरशासकीय संस्था आणि मानवतावादी काम, शिक्षण, विकास कार्यक्रमांचे नियोजन आणि अंमलबजावणी, स्वयंसेवकांचे व्यवस्थापन, स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय पत्रकारिता, आस्थलांतर आणि निर्वासितांसाठी सेवा, प्रवास व पर्यटनविषयक कार्य, आंतरसांस्कृतिक संबंधांबाबत सल्लामसलत, जनसंपर्क आणि संवाद, शहर नियोजन, आंतरराष्ट्रीय विकास, सार्वजनिक आरोग्य, समुदायातील काम, पर्यावरणात्मक व हवामानातील बदल यांचे संशोधन अशा अनेक संधी ही शाखा उपलब्ध करून देते.

## *संस्कृती अध्ययन*

१९६० च्या दशकात पाश्चिमात्य समाजात ‘लोकप्रिय संस्कृती’ चा अभ्यास करण्यामधील रस वाढत होता. त्यातून संस्कृती अध्ययनाची शाखा पुढे आली. संस्कृती अध्ययनाची सुरुवात ही इंग्लंडमधील ‘बर्मिंगहॅम सेंटर फॉर कॉन्टेम्परारी कल्चरल स्टडी’ येथे झाली. विविध प्रकारची समकालीन लोकप्रिय संस्कृती अभ्यासण्याची संधी संस्कृती अध्ययनातून उपलब्ध करून दिली जाते. एखादी व्यक्ती अथवा समुदायाची मूळ अस्मिता, त्यांच्यावर झालेले शिक्कामोर्तब (labelling), उपभोग पद्धती, नियम, अधिकार, सेन्सॉरशिप यांबाबतचे प्रश्न अभ्यासण्याची संधी यातून मिळते.

समकालीन संस्कृती अध्ययनात दैनंदिन जीवनाला अत्यंत गांभीर्याने घेतले जाते. महानगर संस्कृतीमधील जीवनपद्धती, उपभोग आणि सामाजिक संबंध यांचा अभ्यास यात केला जातो. संस्कृती ही दैनंदिन जीवनातून निर्माण होत असते. उदा., दैनंदिन आहार पद्धती, रोजच्या जीवनातील राहणीमान व फॅशन, करमणुकीची साधने, साजरे केले जाणारे सण, उत्सव इत्यादी. थोडक्यात, संस्कृती अध्ययनातून संस्कृती बनण्याची प्रक्रिया अभ्यासली जाते व असे मानले जाते की ही प्रक्रिया सत्ता संबंधांशी जोडलेली आहे.

संस्कृती अध्ययनात इतर अनेक विद्याशाखांमधून अभ्यास पद्धती व सिद्धान्त घेतले जातात.

वर नमूद केलेली सर्व अभ्यास क्षेत्रांची यादी ही सर्वसमावेशक स्वरूपाची नाही, ही समाजशास्त्र या विस्तृत विद्याशाखेत समाविष्ट असलेली काही मोजकी अलीकडील उदाहरणे आहेत. समाजशास्त्राची व्याप्ती ही बदलत्या, आधुनिक व गुंतागुंतीच्या समाजात अधिक व्यापक होत आहे.

**उपक्रम – २**

तुमच्या परिसरातील दोन स्थलांतरित व्यक्तींची मुलाखत घ्या. स्थलांतराचे कारण, अनुभव व समस्यांसंबंधी आपण काढलेल्या निष्कर्षांची वर्गात चर्चा करा.

## १.३ समाजशास्त्राचे महत्त्व

समाजशास्त्राचे महत्त्व पुढीलप्रमाणे :

१. **समाजशास्त्र समाजाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करते :** समाजशास्त्रामुळे समाजाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणे शक्य झाले आहे. विविध क्षेत्रांमध्ये प्रगती साधण्यासाठी गुंतागुंतीच्या मानवी समाजाचे शास्त्रीय ज्ञान असणे आवश्यक आहे. समाजाचे शास्त्र आपल्याला आपल्या क्षमता, आपली बुद्धी व आपले स्व समजण्यास मदत करते. आपल्याला बदलत्या पर्यावरणाशी जुळवून घेण्यासाठी मदत करते. तसेच सामाजिक जीवन समजावून घेण्यासाठी मार्गदर्शन करते.

२. **समाजशास्त्र समाजातील विविधतेसंबंधी ज्ञान देते :** विविध समाज, समूह, समुदाय, त्यांची जगण्याची वैशिष्ट्यपूर्ण पद्धती, सांस्कृतिक विविधता, धार्मिक आणि प्रादेशिक भिन्नता व समाजाचे बहुआयामी स्वरूप समजावून घेण्यासाठी समाजशास्त्र मदत करते.

३. **समाजशास्त्रामुळे वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो :** सामाजिक वास्तवाकडे बघण्याचा शास्त्रीय दृष्टिकोन समाजशास्त्रामुळे विकसित होतो. यामुळे व्यक्ती अधिकाधिक वस्तुनिष्ठ, विवेकवादी, चिकित्सात्मक, पूर्वग्रहमुक्त आणि सकारात्मक विचार करू लागते.

४. **समाजशास्त्र हे व्यवसायाभिमुख आहे :**

समाजशास्त्राची उपयुक्तता दिवसेंदिवस वाढत आहे. आधुनिक काळातील गतिमान समाजाचे समाजशास्त्रीय ज्ञान मिळवण्यासाठी या शास्त्राची नितांत गरज आहे. बदलत्या समाजातील व्यवसायांचे स्वरूपही सतत बदलत आहे. बदलता समाज, बदलत्या गरजा आणि व्यवसायाचे बदलते स्वरूप या सर्वांचा ताळमेळ समाजशास्त्रीय ज्ञान घालू शकते. या दृष्टिकोनामुळे समाजशास्त्राचे महत्त्व वाढत आहे. समाजशास्त्र हा फक्त बंद खोलीत शिकवण्याचा विषय नाही तर अनेक क्षेत्रांत याची उपयुक्तता सिद्ध झाली आहे व वाढत आहे. उदा., उद्योगधंदे, सामाजिक सेवा, समाजकार्य, कायदा, स्पर्धा परीक्षा, मार्केटिंग, जनसंपर्क, पत्रकारिता, प्रसारण, कौशल्य विकास, संपर्क क्षेत्र, बिगर शासकीय संघटना (NGO), कामगार कल्याण, सामाजिक सुरक्षा, विमा क्षेत्र, पुनर्वसन, सामाजिक कल्याण, ग्रामीण विकास, पर्यटन, कुटुंब कल्याण, जनगणना प्रक्रिया, योजना आणि नियोजन, सार्वजनिक आरोग्य, सामाजिक संशोधन, सामाजिक समपुदेशन, पोलिस खाते, आदिवासी कल्याण, सर्वसमावेशक शिक्षण, सुधारणात्मक प्रशासन, उपभोक्ता संशोधन इत्यादी.

५. **सामाजिक समस्यांवर उपाय शोधणे :** सध्याचा समाज हा अनेक सामाजिक प्रश्नांना तोंड देत आहे. जसे की, दारिद्र्य, बेकारी, दहशतवाद, अतिरिक्त लोकसंख्या, स्थलांतर आणि सामाजिक अस्वस्थता, व्यसनाधीनता, सामाजिक विघटन, वांशिक आणि जातीय संघर्ष, धार्मिक

दंगली, जमातवाद, बालगुन्हेगारी इत्यादी हे सर्व प्रश्न सोडवण्यासाठी अतिशय समतोल ज्ञान आवश्यक असते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनाचा योग्य वापर करून असे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला जातो.

६. **समाजशास्त्र हे माणसाला काळानुरूप ज्ञान देते आणि दक्ष ठेवते :** समाजशास्त्राला व्यावहारिक मूल्ये आहे. हे माणसाला काळानुरूप तसेच दक्ष राहण्यास मदत करते. सामाजिक परिस्थिती, सामाजिक घटना, बदलता समाज आणि या सर्वांना योग्य प्रतिसाद कसा द्यावा याचेही भान समाजशास्त्राकडून मिळते.

**उपक्रम – ३**

तुमच्या परिसरातील कुठल्याही बिगरशासकीय संस्थेला भेट देऊन त्यांच्या कामाबद्दल माहिती गोळा करा आणि त्याचे वर्गात PPT सादरीकरण करा.

या पाठात तुम्ही समाजशास्त्राचा अर्थ, स्वरूप, व्याप्ती व समाजशास्त्र अभ्यासण्याची उपयुक्तता जाणून घेतली. यापुढे समाजशास्त्राच्या विकासात योगदान दिलेल्या महत्त्वाच्या विचारवंतांविषयी जाणून घेण्याची उत्सुकता तुमच्यामध्ये निश्चितपणे निर्माण झाली असेल.

## सारांश

- समाजशास्त्रात मानवाचे सामाजिक वर्तन आणि सामाजिक संबंधांचा अभ्यास केला जातो.
- ऑगस्ट कॉम्त यांनी प्रथम 'समाजशास्त्र' ही संज्ञा वापरली त्यामुळे त्यांना समाजशास्त्राचा जनक असे म्हटले जाते.
- 'समाजशास्त्र' हा शब्द 'Latin' भाषेतील 'Socius' आणि ग्रीक भाषेतील 'Logos' या शब्दांपासून बनला आहे. याचा अर्थ 'समाजाचा अभ्यास करणारे शास्त्र'.
- समाजशास्त्राचे संस्थापक/जनक म्हणून कॉम्त बरोबर स्पेन्सर, डरखाईम, मार्क्स, वेबर यांचीही नावे घेतली जातात.
- आधुनिक गुंतागुंतीच्या समाजात समाजशास्त्राला खूप महत्त्व आहे.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. Socius या शब्दाचा अर्थ ............ हा होय.
(शास्त्र, सहकारी, सामाजिक)

२. Logos या शब्दाचा अर्थ ............ हा होय.
(सहयोगी, शास्त्र, पद्धती शास्त्र)

३. समाजशास्त्राचे जनक ............ यांना मानले जाते.
(डरखाईम, वेबर, कॉम्त)

४. समाजशास्त्रज्ञ जेव्हा दैनंदिन जीवनातील व्यावहारिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्याला ............ शास्त्र म्हणतात.
(शुद्ध, व्यावहारिक /उपयोजित, सैद्धान्तिक)

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. (i) जीवशास्त्राच्या मानवी सामाजिक जीवनातील भूमिकेचा अभ्यास – जैव समाजशास्त्र

(ii) सौंदर्यशास्त्र आणि कला जगताचा अभ्यास – कलेचे समाजशास्त्र

(iii) समाजशास्त्र व बाजार नीतितील सैद्धांतिक ज्ञान व ग्राहकांचे विविध प्रकार व त्यांच्या गरजांचे विश्लेषण – बाजार संशोधनाचे समाजशास्त्र

(iv) सामाजिक जीवनातील दृश्यांचा, चित्रांचा अभ्यास – डायस्पोरा अध्ययन

**(क) प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.**

| |
|---|
| डायस्पोरा अभ्यास, The Positive Philosophy, सैद्धांन्तिक विज्ञान |

१. कॉम्तने समाजशास्त्र ही संज्ञा प्रथम या ग्रंथात वापरली -

२. समाजशास्त्रीय सिद्धान्ताचा विकास करणे हे समाजशास्त्रात महत्वाचे असते -

**(ड) अधोरेखित शब्दाच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा.**

१. जेव्हा समाजशास्त्रीय संशोधन हे फक्त संशोधनाच्याच हेतूने केले जाते तेव्हा त्याला व्यावहारिक शास्त्र म्हणतात.

२. बलात्कार, द्वेष, गुन्हा आणि दहशतवाद ही सामाजिक संस्थेची उदाहरणे आहेत.

**प्र.२ (अ) दिलेल्या संकल्पनेचे योग्य उदाहरण लिहा व तुमच्या उत्तराचे समर्थन करा.**

१. समाजशास्त्राचे अनुभवाधिष्ठित स्वरूप.

२. विकास अध्ययन.

**(ब) टीपा लिहा.**

१. समाजशास्त्राचे स्वरूप

२. समाजशास्त्रातील नवीन अभ्यास क्षेत्रे

३. प्रबोधन काळ

**प्र.३ फरक स्पष्ट करा.**

१. नैसर्गिक शास्त्र आणि सामाजिक शास्त्र


२. सैद्धान्तिक शास्त्र आणि उपयोजित शास्त्र

**प्र.४ खालील संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा.**

१. डायस्पोरा

२. जैव समाजशास्त्र

**प्र.५ (अ) संकल्पना चित्र तयार करा.**




**(ब) खालील विधाने चूक की बरोबर ते सांगून सकारण स्पष्ट करा.**

१. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे समाजात बदल घडून आले.

२. नैसर्गिक शास्त्रांमधील प्रगतीचा प्रभाव एक विद्याशाखा म्हणून समाजशास्त्रावर झाला.

**प्र.६ आपले मत नोंदवा.**

१. भारत प्रगतीच्या वैज्ञानिक अवस्थेत आहे का? तुमच्या मताचे स्पष्टीकरण द्या.

२. चित्रपट आणि समाज यांच्यातील संबंधाविषयी थोडक्यात सांगा.

**प्र.७ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (साधारण १५०-२०० शब्द)**

आजच्या जगातील समाजशास्त्राची व्याप्ती याची सुयोग्य उदाहरणांद्वारे चर्चा करा.

**उपक्रम**

वर्गामध्ये प्रत्येकी ५-७ विद्यार्थी-विद्यार्थिनींचे गट करून खालील मुद्द्यांवर गटचर्चा घडवून आणा.

(१) समाजशास्त्र हा दैनंदिन जीवनाशी जोडलेला विषय आहे.

(२) समाजशास्त्रामधील नोकरी/व्यवसायाच्या संधी.

***